महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)

**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**DIRECTORATE OF FORENSIC SCIENCE LABORATORIES, MAHARASHTRA STATE, MUMBAI**

# नागरिकांची सनद

## १. प्रस्तावना :-

महासंचालक (न्यायिक व तांत्रिक). महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त असलेल्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय (एफएसएल) या बहुशाखीय संस्था असुन त्या अत्यंत विशिष्ट प्रकारचे व प्रगत विश्लेषण कार्य करतात. तपासयंत्रणांना आणि त्यामार्फत न्याययंत्रणेला निष्पक्ष शास्त्रीय पुरावे देणे हे एफएसएलचे मुख्य कर्तव्य आहे. ही संस्था भारतीय दंडसंहिता, फौजदारी गुन्हे संहिता, भारतीय शस्त्र कायदा, एनडीपीएस कायदा, स्फोटक पदार्थ कायदा, पेट्रोलियम कायदा, मुंबई पोलीस कायदा, दारूबंदी कायदा, जीवनावश्यक वस्तू कायदा, मोटार वाहन कायदा, माहिती व तंत्रज्ञांन कायदा, वन्यजीव संरक्षण कायदा, टाडा, मकोका इ. कायद्यांतर्गत विविध गुन्हे प्रकरणांमध्ये वैज्ञानिक विश्लेषणात्मक अहवाल पुरवते. प्रयोगशाळांमधील मूलभूत सुविधांचे आधुनिकीकरण करून ' त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनवण्यात आलेले आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतून दिलेले अहवाल न्यायदान प्रक्रियेत अत्यंत महत्वाचा पुरावा म्हणुन ग्राहय धरण्यात येतो.

## २. उद्दिष्टे :-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये समाजात घडणा-या निरनिराळया गुन्हयांमधील जप्त मुददेमालावर शास्त्रीय पध्दतीने विश्लेषणाचे कार्य केले जाते. शास्त्रीय विश्लेषणाव्दारे देण्यात येणा-या परिस्थितीजन्य पुरावा मा.न्यायालयामध्ये भक्कम पुरावा म्हणून उपलब्ध करुन दिला जातो. तसेच संचालनालयामध्ये दाखल होणारी प्रकरणे ही वेगवेगळया गुन्हयांशी संबंधित असतात. अनेक संवेदनशील प्रकरणे प्रयोगशाळांमध्ये दाखल होतात व अशा प्रकरणांचे अहवाल तपासी यंत्रणेला तात्काळ उपलब्ध करुन दिले जातात. दाखल झालेल्या मुददेमालावर रासायनिक विश्लेषण करुन सामाजिक दृष्टीकोनातून तपास यंत्रणांना आणि पर्यायाने मा.न्यायदान यंत्रणेला महत्वाचा वैज्ञानिक पुरावा वेळेवर उपलब्ध करुन देणेकामी या प्रयोगशाळेची भुमिका महत्वाची असते.

## ३. दृष्टीक्षेप (Vision) :-

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कायद्यामधील तरतूदींच्या अनुषंगाने गुन्हयांमध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ञांकडून परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणेकामी घटनास्थळांना भेट देणेकामी सर्व राज्यांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान व उत्कृष्ट कार्यपध्दतीचा वापर करून मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स कार्यान्वित करून गुन्हयांना आळा घालून न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या व्यवस्थापनात देशात अग्रस्थानावर पोहोचवणे.

## ४. या विभागाची रचना :-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई येथे मुख्य प्रयोगशाळा कार्यान्वित असून नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, नांदेड व कोल्हापूर या प्रादेशिक प्रयोगशाळा व चंद्रपूर, रत्नागिरी, सोलापूर, धुळे व ठाणे या ५ लघु अशा एकुण १३ प्रयोगशाळांव्दारे विश्लेषणाचे काम चालते. सदर प्रयोगशाळांचे संलग्न जिल्हे खालीलप्रमाणे आहेत.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रयोगशाळेचे नाव</th><th>जिल्हे</th><th>कार्यरत विभाग</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">मुंबई प्रयोगशाळा (मुख्यालय)</td><td>मुंबई, रायगड</td><td>विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, क्षेपणास्त्र, भौतिकशास्त्र, दारूबंदी व उत्पादनशुल्क, छायाचित्रण, मानसशास्त्र, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td>ठाणे, पालघर</td><td>डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, क्षेपणास्त्र, भौतिकशास्त्र, दारूबंदी व उत्पादनशुल्क, छायाचित्रण, मानसशास्त्र, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">नागपूर प्रादेशिक प्रयोगशाळा</td><td>नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा</td><td>विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, क्षेपणास्त्र, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td>चंद्रपूर, गडचिरोली</td><td>डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, क्षेपणास्त्र, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">पुणे प्रादेशिक प्रयोगशाळा</td><td>पुणे, सातारा</td><td>विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td>सोलापूर</td><td>डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक प्रयोगशाळा</td><td>छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड</td><td>विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td>धाराशिव</td><td>डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td rowspan="2">५</td><td rowspan="2">नाशिक प्रादेशिक प्रयोगशाळा</td><td>नाशिक, जळगाव, अहिल्यानगर</td><td>विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
<tr><td>धुळे, नंदुरबार</td><td>डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | कोल्हापूर प्रादेशिक प्रयोगशाळा | सांगली, कोल्हापूर | विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण |
| | | रत्नागिरी, सिंधुदुर्ग | डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण |
| ७ | अमरावती प्रादेशिक प्रयोगशाळा | अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम | विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण |
| ८ | नांदेड प्रादेशिक प्रयोगशाळा | नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली | विषशास्त्र, जीवशास्त्र, डिएनए, सामान्य विश्लेषण व उपकरणीय, दारूबंदी व उत्पादनशुल्क, संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण |
| ९ | चंद्रपूर लघु प्रयोगशाळा | चंद्रपूर, गडचिरोली | विषशास्त्र व जीवशास्त्र |
| १० | रत्नागिरी लघु प्रयोगशाळा | रत्नागिरी, सिंधुदुर्ग | |
| ११ | धुळे लघु प्रयोगशाळा | धुळे, नंदुरबार | |
| १२ | ठाणे लघु प्रयोगशाळा | ठाणे, पालघर | |
| १३ | सोलापूर लघु प्रयोगशाळा | सोलापूर, धाराशिव | |

## ५. विभागाची बांधिलकी :-

(अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

(ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेवून कामाच्या वेळेत निपटारा करेल.

(क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

(ड) विमा अथवा सरकारी दावा यांच्याशी निगडीत प्रकरणांकरीता भरावयाचे विहित नमुने व अर्ज मिळविण्यासाठी कार्यपध्दती, प्रत्येक नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

## ६. विभागाची संबंधित व्यक्ती आणि संस्था :-

(१) नागरीक

(२) विभागामध्ये काम करत असलेला अधिकारी व कर्मचारी

(३) पोलीस व न्यायसंस्था

(४) केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, प्राधिकरणे, आयोग, सार्वजनिक संस्था, महामंडळे, कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन.

## ७. नागरिकांचे अपेक्षित सहकार्य :-

(१) सेवा पुरविण्यासाठी आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्ण व नियमानुसार असावी.

(२) नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न व आपत्कालीन परिस्थीती उद्भवल्यास, या सनदेमध्ये नमूद कालावधीमध्ये वाढ होऊ शकते.

(३) सेवा सुधारण्यासाठी सहकार्य करावे /सूचना करणे.

## ८. कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभागामार्फत समाजात घडणा-या निरनिराळया गुन्हयांमधील जप्त मुददेमालावर शास्त्रीय पध्दतीने विश्लेषणाचे कार्य केले जाते. अशा प्रकरणांचे अहवाल मा.न्यायदान यंत्रणेला व तपासी यंत्रणेला तात्काळ उपलब्ध करुन दिले जातात. त्यामुळे या विभागाचे तांत्रिक विश्लेषणाच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता त्याचा थेट संपर्क नागरिकांकरीता पुरवण्यात येणाऱ्या सेवा संदर्भात येत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ द्वारे नागरिकांना त्यांची शासकीय कार्यालयातील कामे ठराविक वेळेमध्ये पूर्ण करुन मिळविण्याची हमी मिळाली आहे. नागरिकांची कामे विहित मूदतीत पूर्ण करण्याबाबत शासकीय कार्यालये या कायद्याने बांधिल राहतील.

## ९. नियम/अधिनियम /शासन निर्णय :-

या विभागाशी संबंधित नियम / अधिनियम / महत्वाचे शासन निर्णय गृह विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय या विभागाच्या https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून ते नियमितपणे अद्ययावत करण्यात येतात.

## १०. (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण :-

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी अपिलीय अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदवता येईल.

### (ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-

या नागरिकांच्या सनदेचा उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

### (क) जनसामान्यांकडून सूचना :-

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य आणि यथोचित सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय या विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

## ११. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांची राहील.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभागाच्या संकेतस्थळावर तसेच प्रत्येक कार्यालयामध्ये नागरिकांच्या सनदेचे फलक लावून सनदेस व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

---XX---XX---